आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

गुरुवार दिनांक १९ डिसेंबर २०२४

ठळक बातम्या

1. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलेल्या विधानावरून आज सलग दुसऱ्या दिवशी संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे गदारोळ.
2. विधान परिषद सभापतीपदी प्रा.राम शिंदे यांची एकमतानं निवड.
3. विरोधकांनी निवडणूक आयोगावर दाखविलेला अविश्वास म्हणजे संविधानावर अविश्वास- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन.
4. महायुतीच्या आमदारांनी नागपूरच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या परिचय वर्गाला लावली हजेरी.

---------------------------------

संसद

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलेल्या विधानावरून आज सलग दुसऱ्या दिवशी संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे गदारोळ झाला. घोषणाबाजीमुळे कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. लोकसभेत कामकाज सुरू झाल्यावर काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पार्टी, आणि इतर पक्षांचे सदस्य अमित शाह यांच्या विरोधात घोषणा देऊ लागले. काही सदस्य सभापतींसमोरच्या मोकळ्या जागेत शिरले. घोषणा चालूच राहिल्यानं सभापती ओम बिरला यांनी आधी दुपारी २ वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं. त्यानंतरही गदारोळ चालूच राहिला आणि कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. राज्यसभेत या आणि इतर विषयावरून विरोधी पक्ष सदस्यांनी दिलेले स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळले. त्याच्या निषेधात काँग्रेस, द्रमुक, आम आदमी पार्टी, समाजवादी पार्टी, राजद आणि इतर पक्षांच्या सदस्यांनी घोषणा द्यायला सुरुवात केली. गोंधळ वाढतच गेल्यामुळे अध्यक्षांनी दुपारी २ वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं. नंतरही घोषणा चालूच राहिल्यानं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं. दरम्यान, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अवमानजनक वक्तव्य केल्याबद्दल त्याच्या निषेधार्थ आज गडचिरोली इथं काँग्रेस पक्षाच्या वतीनं निदर्शनं करण्यात आली.

---------------------------------

**विधान परिषद सभापती निवड/उपमुख्यमंत्री शिंदे/राज्यपाल अभिभाषण उत्तर**

विधान परिषदेचे सभापती म्हणून प्रा.राम शिंदे यांची आज एकमतानं निवड झाली. शिंदे यांची बिनविरोध निवड झाल्याचं उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी जाहीर केलं. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी प्रा.राम शिंदे यांचं स्वागत केलं तसंच त्यांना शुभेच्छा दिल्या. दरम्यान, विधानपरिषदेत राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की महाराष्ट्राला सर्व आघाड्यांवर पहिल्या क्रमांकाचं राज्य करतानाच विकसित भारताला विकसित महाराष्ट्राची भक्कम जोड आपल्या सरकारला द्यायची आहे. गेल्या अडीच वर्षात राज्याच्या कायापालटाला सुरूवात झाली असून आता आमचं एकत्रित मिशन महाराष्ट्र समृद्ध करण्याचं आहे. त्यासाठी आम्ही तिप्पट वेगानं महाराष्ट्राला विकासमार्गावर नेऊ, महाराष्ट्र आता थांबणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. एकाही पात्र लाडक्या बहिणीच्या खात्यात जाणारे पैसे बंद होणार नाहीत, असा शब्द त्यांनी सर्व महिलांना दिला. यावेळी त्यांनी राज्याच्या आणि विदर्भाच्या विकासासाठी केलेल्या कामांचा आढावा घेतला. सध्या राज्यात १० लाख कोटी रुपयांची पायाभूत सुविधांची कामं सुरू आहेत. राज्याच्या एका भागातून दुसऱ्या भागात जाण्यासाठी सात ते आठ तासांपेक्षा जास्त वेळ लागता कामा नये, असं आमचं नियोजन असल्याचं उपमुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

--------------------------------

**महिला काँग्रेस**

अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या अध्यक्षा अलका लांबा यांच्या आदेशानं महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या राज्य, जिल्हा आणि ब्लॉक स्तरीय सर्व समित्या तत्काळ प्रभावानं विसर्जित करण्यात आल्या आहेत. संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी आणि महाराष्ट्र राज्यातील महिला काँग्रेसच्या सदस्यत्व मोहिमेला गती देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्रातील महिला काँग्रेस संघटनेच्या उभारणीसाठी संध्या सव्वालाखे यांच्या सोबत डॉ. अंजली ठाकरे -अमरावती, सुनीता गावंडे- रामटेक, सीमा विनोद सहारे- गडचिरोली-चिमूर असा कार्यभार सांभाळतील.

--------------------------------

**विधान सभा कामकाज-देवेंद्र फडणवीस उत्तर**

विधानसभा निवडणुकीत जनतेने दिलेला कौल स्वीकारा; त्यांचा अपमान करू नका. देशविरोधी कारवाया करणाऱ्या अर्बन नक्षल संघटनांना आपला खांदा विरोधकांनी वापरण्यासाठी देऊ नये, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे.

विधानसभेत गेले दोन दिवस झालेल्या राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शन प्रस्तावावरील चर्चेला ते उत्तर देत होते. विरोधकांनी निवडणूक आयोगावर दाखविलेला अविश्वास म्हणजे संविधानावर अविश्वास आहे. हा राजद्रोहच आहे, असंही ते म्हणाले. लोकसभा निवडणुकीनंतर आम्ही ईव्हीएमला दोष न देता फेक नरेटिव्हला थेट नरेटिव्हनं उत्तर दिलं. आजवर ईव्हीएम विरोधात दाखल झालेल्या असंख्य याचिका सर्वोच्च न्यायालयानं फेटाळल्या आहेत, असं फडणवीस म्हणाले. ज्या योजना आम्ही सुरू केल्या आहेत त्या सुरूच राहतील. जी आश्वासने दिली आहेत ती पूर्ण केली जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. शेतकरी, युवा, वंचित, बहिणी यांना दिलेली सर्व आश्वासनं पूर्ण केली जातील, लाडक्या बहिणींना डिसेंबरचा हप्ता हे अधिवेशन संपताच दिला जाईल, असं मुख्यमंत्री म्हणाले. ऊर्जा क्षेत्र विशेषतः सौर ऊर्जेबद्दल बोलताना त्यांनी सांगितले......

मागेल त्याला सौरपंप पेड, पेंडिंग वगैरे विषयच नाही. नो पेडपेंडींग तुम्ही मागितल्यानंतर तीन महिन्यामध्ये आम्ही कनेक्शन देऊ आणि यांच्यामध्ये आज आपण जवळपास याठिकाणी २ लाख ३६ हजार १८६ पंपाचं त्याठिकाणी फिटिंग देखील करून टाकलं, म्हणजे याकरिता विभागाचं 'अभिनंदन करतो कि मी जेंव्हापासन सौरपंपाच वाटप आणि योजना सुरु केल्या वेगवेगळ्या, या सगळ्या काळामध्ये दादा आपण जेवढे सौरपंप लावलेत त्यापेक्षा जास्त सौरपंप, मागच्या एका वर्षात लावलेत आणि मोठ्या प्रमाणात हे काम चाललेलं आहे. पण मला असं वाटत कि ऊर्जा क्षेत्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणात आपण मागच्या काळामध्ये योजना सुरु केल्या आहेत.

राज्य थेट परदेशी गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर आहे. राज्यात अनेक मोठे उद्योग येत आहेत. उद्योगधंद्यांना अभय देणं हे सरकारचं कर्तव्य आहे. त्यांना त्रास देणाऱ्यावर कठोर कारवाई केली जाईल, अशी खात्री त्यांनी दिली. तत्पूर्वी, मुंबईत काल झालेल्या बोट दुर्घटनेप्रकरणी काँग्रेसचे नाना पटोले यांनी आज विधानसभेत स्थगन प्रस्ताव मांडला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही यावर चर्चा करण्याची तयारी दर्शवली. या घटनेबद्दल सरकारने आजचं कामकाज संपेपर्यंत निवेदन द्यावं, त्यानंतर चर्चा घेण्याबाबत निर्णय घेतला जाईल, असं अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितलं. बीड जिल्हयातल्या माजी सरपंचांची हत्या आणि परभणीतल्या हिंसाचाराच्या मुद्यावर विधानसभेत चर्चा आज पुन्हा सुरू झाली.

---

कांदा निर्यात

केंद्र सरकारनं कांदा निर्यातीवर लावलेलं 20 टक्के शुल्क तातडीनं रद्द करण्याची मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय व्यापार आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांना पत्र लिहून केली आहे. श्रीलंका सरकारनं कांद्यावरील आयातशुल्क 20 टक्क्यांनी कमी करून अधिकाधिक कांदा आयातीचे प्रयत्न सुरू केले असल्यानं नाशिकसह राज्यातील शेतकऱ्यांना त्यांचा लाल कांदा श्रीलंकेसह परदेशांमध्ये निर्यात करता यावा, कांद्याला खर्चावर आधारित चांगला दर मिळावा, यासाठी केंद्र सरकारनं कांद्यावरील 20 टक्के निर्यातशुल्क तातडीनं रद्द करणे आवश्यक असल्याचं उपमुख्यमंत्री पवार यांनी गोयल यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे.

--------------------------------

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिचय वर्ग

महायुतीच्या आमदारांनी आज, सकाळी नागपूरच्या रेशीमबाग इथं आयोजित राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या परिचय वर्गाला हजेरी लावली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह इतर आमदारांची उपस्थिती होती.

राज्य विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन सध्या नागपुरात सुरू आहे. दरवर्षी या अधिवेशनादरम्यान भाजप आणि मित्र पक्षातील आमदारांसाठी संघ परिचय वर्ग आयोजित केला जातो. या भेटीसंदर्भात प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले-

कुठलीही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता संघाचा स्वयंसेवक काम करतो. देशभरामध्ये संघाच्या पाच लाख शाखा आहेत' जो खऱ्या अर्थाने समाजसेवा करणार आहेत, निरपेक्ष भावनेने त्याने जरूर एकदा तरी यावं आणि येथून प्रेरणा घेऊन जावी आणि म्हणून मी दरवर्षी येतो आज आमचे सगळे आमचे सहकारी याठिकाणी आलेत.

--------------------------------

विशेष गाड्या

उत्तरप्रदेशात प्रयागराज इथल्या महाकुंभमेळ्यासाठी मध्य रेल्वे चौतीस विशेष गाड्या सोडणार आहे. मुंबई, पुणे, नागपूर तसंच इतर ठिकाणांहून या विशेष गाड्या सुटतील. या गाड्यांमध्ये 20 डिसेंबरपासून प्रवासी आरक्षण प्रणाली तसंच irctc.co.in या रेल्वेच्या संकेतस्थळावरून आरक्षण करता येईल. या विशेष गाड्यांमध्ये दुसऱ्या वर्गाचे डबे हे अनारक्षित असतील आणि त्यासाठी रेल्वेच्या युटीएस ॲपवरून तिकीट काढता येईल. याबद्दलची सविस्तर माहिती रेल्वेच्या संकेतस्थळावर मिळेल.

--------------------------------

स्वयंरोजगाराचे धडे

कारागृहातून मुक्त झाल्यानंतर कैद्यांना स्वत:च्या पायावर उभे राहता यावे, या उद्देशाने बुलढाणा जिल्हा कारागृहातील बंद्यांकरिता स्वयंरोजगाराचे धडे देण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने सेंट ग्रामीण प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून गेल्या 16 डिसेंबरपासून सहा दिवसांचे फास्ट फुड उद्योग प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षणाला बंद्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन सहभाग नोंदविला. बुलढाणा जिल्हा कारागृहामध्ये 323 न्यायाधीन बंदी आहेत. या बंद्यांसाठी प्रशिक्षण देण्यात येत असून पहिल्या तुकडीमध्ये 32 बंद्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

-------------------------------

हवामान

विदर्भात किमान तापमानात दररोज किंचित वाढ होत असून नागपुरात आज नऊ पूर्णांक दोन इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. याशिवाय गोंदिया इथं नऊ पूर्णांक सहा इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. वर्धा, अकोला आणि भंडारा या जिल्ह्यात दहा अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान नोंदवलं गेलं. गडचिरोली, अमरावती, वाशिम या जिल्ह्यांमध्ये 11 अंश सेल्सिअस, तर बुलढाणा इथं तेरा अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवलेल्या अंदाजानुसार आगामी काही दिवसात किमान तापमानात वाढ होणार आहे. याखेरीज, येत्या दोन दिवसांमध्ये तापमान मध्य भारतात तीन ते चार अंश सेल्सिअसनं तर देशाच्या पूर्व भागात दोन ते तीन अंश सेल्सिअसनं वाढण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे.

-------------------------------